सुविचार

जगणे सोपे आहे परंतु जगावे कसे हे जो निश्चित करतो तो जीवनाचा उत्कर्षबिंदू गाठतो.

– डॉ. प्रकाश कोल्हे

संपादक : डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे
उपसंपादक : ज्योती प्रकाश कोल्हे

मानव सेवा हिच खरी ईश्वर सेवा
मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था

शालेय वृत्तपत्र

पाने : ८

# मानवधन

वर्ष १४ वे

Website : www.manavdhan.in । E-mail : manavdhanpsk@gmail.com

जुलै २०२६

# वीस हजार सीडबॉलच्या माध्यमातून वृक्षारोपण; मानवधन संस्थेचा उपक्रम

## विद्यार्थ्यांकडून पांडवलेणी डोंगर परिसरात बीजारोपण; 'वसुंधरा वाचवा'ची घेतली प्रतिज्ञा



**नाशिक** : निसर्गाचा समतोल राखण्याबरोबरच वनसंपदा वाढविण्याच्या उद्देशाने मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था नाशिक संचलित सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी 'सीडबॉल' बनविण्याचा अभिनव उपक्रम राबविला. पारंपरिक वृक्षारोपण पद्धतीला पर्याय म्हणून ओल्या मातीच्या गोळ्यात विविध फळांच्या बिया रोवून तयार केलेले सीडबॉल विद्यार्थ्यांनी पांडवलेणी डोंगर परिसरात नेऊन त्यांचे बीजारोपण केले.

या उपक्रमावेळी ज्येष्ठ कवयित्री तथा समाजसेविका माधुरी माटे, संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे, संस्था सचिव तथा मुख्याध्यापिका ज्योती कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी 'वसुंधरा वाचवा' अशी पर्यावरण संवर्धनाची प्रतिज्ञा घेतली. डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे व ज्योती कोल्हे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षकांच्या नियोजनातून विद्यार्थी दरवर्षी सीडबॉल तयार करतात. परिसरातील लोक व विद्यार्थ्यांनी स्वतः संकलीत केलेल्या विविध फळांमधील बिया पावसाळ्याच्या सुरुवातीस ओल्या मातीच्या गोळ्यांमध्ये त्यांची लागवड करत डोंगराळ व मोकळ्या परिसरात टाकून नैसर्गिक पद्धतीने वृक्षनिर्मितीसाठी प्रयत्न केले जातात. सन २०१८ मध्ये विद्यार्थ्यांनी तब्बल १५ हजार सीडबॉल तयार करून त्र्यंबकेश्वर तालुक्यातील रोहिले गाव परिसरातील सुमारे १७० एकर डोंगर क्षेत्रात त्यांचे बीजारोपण केले होते. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या आणि जीवनाभिमुख पर्यावरणपूरक उपक्रमाची वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. यावेळी संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे यांनी सांगितले की, सामाजिक वनीकरण आणि वनसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक कर्तव्यदक्ष आणि सुजाण नागरिकाचेही कर्तव्य आहे. पर्यावरण संवर्धनाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी अशा कृतीशील उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच सर्व मानवसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.

# ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल वाडीवऱ्हे येथे राष्ट्रध्वज स्वीकृती दिन साजरा



**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल येथे राष्ट्रध्वज स्वीकृती दिन तसेच उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक ज्ञानरत्न मा. डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे (दादा), संस्थेच्या सचिव मा. ज्योती कोल्हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. राष्ट्रध्वजाबद्दल संपूर्ण माहिती, वैशिष्टे, महत्त्व, इत्यादी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्याच प्रमाणे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित दादा पवार यांच्या जीवनकार्याची माहिती , त्यांचे राजकारणातील योगदान, धोरणे, इत्यादी माहिती उपशिक्षक श्री. आकाश घोटे यांनी दिली. या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांची जयंती उत्साहात साजरी




**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ, विज्ञानप्रसारक व पद्मविभूषण डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. जयंत नारळीकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश (दादा) कोल्हे, संस्थेच्या सचिव सौ. ज्योती कोल्हे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वैशाली पवार उपस्थित होत्या.

याप्रसंगी डॉ. प्रकाश (दादा) कोल्हे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासत जिज्ञासू वृत्ती विकसित करावी, विज्ञानाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे आणि डॉ. जयंत नारळीकर यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे सांगितले. सौ. ज्योती कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम यांबद्दल आवड निर्माण करण्यासाठी अशा महान शास्त्रज्ञांचे जीवनचरित्र जाणून घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. मुख्याध्यापिका सौ. वैशाली पवार यांनी डॉ. जयंत नारळीकर यांच्या विज्ञान क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची माहिती देत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, प्रयोग करण्याची आणि वैज्ञानिक विचारसरणी अंगीकारण्याची प्रेरणा दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. जयंत नारळीकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषण व नाटिका सादर करण्यात आल्या.

# संपादकीय

## ध्येयवेड्या माणसातला 'मी'

प्रत्येक माणसाच्या जीवनात काहीतरी ध्येय असते. त्या ध्येयाप्रती तो जीवन जगत असतो. ध्येपूर्तीसाठी कार्य करत असताना माणसातला 'मी' जागा होतो. या 'मी'चे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक माणूस जीवनात स्वार्थ ठेवूनच कार्य करत असतो. या स्वार्थाचे स्वरूप मात्र वेगवेगळे असू शकते. स्वार्थभावनेतूनच 'मी'चा जन्म होतो. प्रत्येक माणसाला स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची ओढ असते. या अस्तित्व सिद्धतेत 'मी' किती श्रीमंत किंवा धनवान, यावरच माझी ओळख अवलंबून असते असा गोड गैरसमज माणसामाणसांमध्ये दिसून येतो. हा 'मी' माणसामध्ये नैसर्गिकरित्या निर्माण झाल्याचे दिसून येते. आज प्रत्येकामध्ये ओढ लागली ते 'मी'चे साम्राज्य वाढविण्यासाठीच. परंतु या 'मी'ची खरी ओळख समजून घेतली तर 'मी'चे महानत्व फारच विशाल आहे असे कळेल. त्याचे मोजमाप कोणीच करू शकत नाही. आपला 'मी' सिद्ध करावयाची गरजच नाही. माणसाने आपले कर्तृत्व सातत्याने व सत्याच्या मार्गाने पुढे नेले. कोणत्याही प्रकारची स्वार्थभावना न ठेवता माझा जन्म हा स्वतःसाठी नसून इतरांच्या हितासाठी व कल्याणकारी कार्यासाठी आहे असे जेव्हा आपण विचार करू तेंव्हा आपल्या हातून महान कार्य घडेल. आपले महानत्व सिद्ध करण्याची गरजच उरणार नाही. आज बरीच माणसे स्वतःची ओळख ही त्यांच्या पदावरून किंवा त्यांच्याकडे असलेल्या धनसंपत्तीचा आधार घेऊन करतात. परंतु महान पुरूषांची ओळख ही त्यांना कधीच करून द्यावी लागलीच नाही. त्यांची ओळख करून देण्यासाठी असंख्य माणसे पुढे आलीत. आजही त्यांचे 'मी' पण सांगण्यासाठी लोक कमी पडत नाही. याचे मुख्य कारण महान व्यक्ती 'मी'च्या पाठीमागे न धावता ते कर्तृत्वाच्या मागे धावतात. कर्तृत्वातूनच त्यांचे 'मी'पण सिद्ध होत असते. आज महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, मदर तेरेसा, संत ज्ञानेश्वर यासारख्या ज्ञानीगुणी महापुरुषांना स्वतःची ओळख कधीच करून द्यावी लागली नाही. त्यांच्या 'मी'पणात स्वार्थ नव्हता त्यांचा 'मी' हा जनमाणसांनीच सिद्ध केला.

आजही त्यांचे मोठेपण जोपासण्यासाठी व त्यांच्या 'मी'ची ओळख करून देण्यासाठी लोक मोठ्या संख्येने व आनंदाने पुढे येताना दिसतात. या त्यांच्या 'मी'पणाचे रहस्य आपणही समजून घ्यावे. त्यांच्या 'मी'पणात स्वार्थभावना मूळीच नव्हती. त्यांच्यामध्ये फक्त एखाद्या कार्यात मनापासून झोकून देण्याची व ध्येय साध्य होईपर्यंत कर्तृत्वावर निष्ठा, भक्ती, प्रेम इच्छाशक्ती होती. त्यामुळे अशा ध्येयवेड्या माणसांची ओळख त्यांना स्वतःला कधीच करून घ्यावी लागली नाही. त्यांनी जगाच्या कल्याणाकरिता स्वतःला पुर्णपणे झोकून दिले त्यामुळे त्यांचा 'मी' लोकानी दाखवून दिला. त्यांना कधीच 'मी'पणाची गरज भासली नाही. आज कर्तृत्वाच्या उंच शिखरावर त्यांच्या 'मी'चा झेंडा उंच उंच फडकवत आहे. आजच्या सामाजिक परिस्थीतीत 'मी'चे स्वरूप स्वार्थाशीच चिकटलेले आहे म्हणून आज आपण स्वतःच आपल्या 'मी'बद्दल विचार करतो. तुमची ओळख ही लोकांनी करून द्यावी असे जेव्हा वाटेल तेंव्हा तुमच्यामध्ये ध्येयवेड्या माणसातला 'मी' असल्याची ओळख जगाला पटेल. मग आपल्या 'मी'साठी ध्येयाची उंची गाठा व ध्येयवेडे बनून जनहितार्थ कर्तृत्व दाखवा. एक दिवस आपली ओळख लोक करून देतील. तेंव्हा स्वतःमध्ये 'मी' असल्याचा अभिमान तुम्हांला जरूर वाटेल. बघा तुमच्या मधील 'मी'चे सामर्थ्य कारण तुमच्या मध्ये सूर्यासमान ऊर्जा साठवलेली आहे. याचा यथायोग्य वापर करा. कर्तृत्वरूपी क्रांतिसूर्य बना. खऱ्या 'मी'साठी.

डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे (दादा)
संस्थापक, मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था, नाशिक

### निसर्ग

जीवनाचा खरा मित्र
पहाटेच्या त्या मंद किरणांनी
धरती होते सोन्याने न्हाली
दवबिंदूंच्या मोत्यांनी सजते

हिरवीगार ती गवताची शाली.
उंच डोंगर अभिमानाने उभे,
त्यांच्या कुशीत दऱ्या-खोऱ्या.
झुळझुळ वाहणाऱ्या नदीकाठी,
गातात पक्षी मधुर गाणी.

हिरवीगार वनराई दाट,
फुलांनी भरले प्रत्येक रान.
रंगीबेरंगी फुलपाखरे उडती,
सुगंधाने दरवळते वन.

आंबा, वड, पिंपळ, चिंच,
झाडे देतात गार सावली.
फळे, फुले, प्राणवायू देऊन,
भरभरून करतात मदत खरी.

कोकीळेचा मधुर किलबिलाट,
मोराचा सुंदर नाच निराळा.
चिमणी, साळुंकी, पोपट सारे,
निसर्गाचा आनंदच जणू झाला.

पावसाच्या सरी कोसळता,
मातीचा सुगंध दरवळतो.
शेतकरी आनंदाने हसतो,
हिरवा शेतमळा डोलू लागतो.

इंद्रधनुष्याच्या सात रंगांनी,
आकाश होते किती सुंदर!
चांदण्यांच्या त्या लखलखाटात,
रात्रही वाटे मनोहर.

सूर्य देतो प्रकाश जगाला,
चंद्र देतो शीतल छाया.
तारे चमकती नभांगणात,
निसर्गाची ही सुंदर माया.

निसर्ग आहे जीवनदाता,
त्याच्यामुळे सृष्टी बहरते.
झाडे लावा, झाडे जगवा,
धरती आई हसत राहते.

पाणी, हवा आणि जंगल,
हीच खरी आपली संपत्ती.
त्यांचे जतन करू या सारे,
हीच मानवाची जबाबदारी.

(संकलीत)

-**विद्या गोवर्धने**, इयत्ता १२ वी
वाणिज्य, धनलक्ष्मी ज्युनियर कॉलेज,
पाथर्डी फाटा


हेमांगी पंडी, इयत्ता १०वी, धनलक्ष्मी माध्यमिक विद्यालय, पाथर्डी फाटा



रुद्राराज आव्हाड, इयत्ता ९ वी, प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, पाथर्डी फाटा, नाशिक



मयांक गुप्ता, इयत्ता ७वी, ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल, वाडीवऱ्हे, नाशिक



श्रेया कुमार, इयत्ता ५वी, प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, जाधव संकुल, सातपूर, नाशिक



## झाड

झाड म्हणजे जीवनाचा श्वास
निसर्गाचा अमूल्य खजिना
फुले, फळे, सावली देत
सांभाळते धरतीचा कोपरा
पक्ष्यांना देते घरटे सुंदर
प्राणवायू देते सर्वांना
पावसाचे स्वागत करते
जीवन देते सृष्टीला
एक झाड आपण लावू या
त्याची प्रेमाने सेवा करू या
हिरवागार होईल आपला देश
निसर्गाचे ऋण फेडू या

(संकलित)

**– ओम ठोंबरे,** इयत्ता १०वी
धनलक्ष्मी माध्यमिक विद्यालय,
पाथर्डी फाटा

## माझे छोटे जग

माझ्या छोट्याशा जगात
स्वप्नाचे एक आभाळ आहे
त्यात रुतलेले मन
आणि आनंदाचा सोहळा आहे

आईच्या ओठांवरच हसू
बाबांच्या डोळ्यातला विश्वास
माझ्या काळजातला श्वास

लहान माझे आयुष्य
पण स्वप्न जगात वेगळे
आई–बाबांना बघून
जगायचे फक्त खरे

(संकलित)

**– आदिती वारुंगसे,** इयत्ता १०वी,
धनलक्ष्मी माध्यमिक विद्यालय,
पाथर्डी फाटा

## माझं कूळ

मी ऐकलं की,
माझा आजा देवाघरी गेल्यावर
बापच सर्वांचा बाप झाला

गावासाठी राबणारा
नांगर, वखर बनवणारा
सर्व गावाचं कुळ करायाचा
माझं कुळही तो सांभाळायचा
शेतात तो राबायचा
सर्जाराजाची साथ करायचा
अनेकाच्या संसाराची पायाभरणी
त्यानेच केली

संसारवेलीवर त्यानेच फूले फुलवली
स्वतः राम असूनही
कधीच गाजावाजा केला नाही
त्यागाची मूर्ती असूनही
कधीच स्वतःची महती गायली नाही

घराचा खांब, पाया, भिंत
आणि छप्पर देखील बाप माझा
सर्व पंढरपूरच अवतारायचं
जेव्हा घरात वावरायचा बाप माझा

(संकलित)

**अंशिका ढोमसे,** इयत्ता ५ वी
ब्राईट इंग्लिश मिडीयम स्कूल,
वाडीवऱ्हे

## आम्ही चालवू हा पुढे वारसा

गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा
पिता–बंधु–स्नेही तुम्ही माऊली
तुम्ही कल्पवृक्षातली सावली

तुम्ही सूर्य आम्हा दिला कवडसा
जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा

जरी दृष्टी कोणी करू शासन
गुणी सज्जनांचे करू पालन
मनी मानसी हाच आहे ठसा
तुमची सेवा फळा ये अशी
तुमची कीर्ती राहील दाही दिशी
अंगा पुण्यावंता भल्या माणसा.

(संकलित)

**–वैशाली निकम,** इयत्ता ९ वी, अ
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल,
जाधव संकुल, सातपूर

## भाजीच भाजी

भाजीच भाजी फळभाजी
तोंडली, वांगी गोष्टीची सांगी

गाजर, काकडी घालतात कोडी
कांदा, कोबी भलतेच कोभी

लिंबू, मिरची चव आमची
टोमॅटो, बटाटा करतात टाटा

(संकलित)

**प्रिया मावची,** इयत्ता ४ थी
ब्राईट इंग्लिश मिडीयम स्कूल,
वाडीवऱ्हे

## पाऊस

टिप टिप पाऊस झो झो वारा
गीत गाऊ पाहतो आसमंत सारा
कडाडणारी वीज गडगडणारे ढग
धावणाऱ्या छत्रीतली आपली लगबग
डराव डराव बेडकं छम छम तळे
लेझीम हाती घेऊनी जणू
थेंब लाटेवर पळे
खळ खळ झरा तड तड पत्रा
पावसाने भरवली बघा
ताला सुरांची जत्रा

(संकलित)

**–गौरी पाटील,** इयत्ता ९वी, अ
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल,
जाधव संकुल, सातपूर

## आजोबा

वाटते मला आजोबा व्हावे
इकडून तिकडे उगेच फिरावे,
नाकावर चष्मा लावावा
नुसताच पेपर चाळावा
अस्से दात बसवावे
आणि अस्से दात काढावे
तासभर देवापुढे बसावे
मऊ मऊ गरम अन्न खावे
रोजच शाळेला मिळेल सुटी
अभ्यासाच्या कटकटीला बुट्टी
आजी पाय चेपून देईल
बाबा सल्ला घ्यायला येतील
आई नम्रतेने उभी राहील
माझ्या आजीची वाट पाहील.

(संकलित)

**–यशश्री गवळी,** इयत्ता ९ वी, अ
ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल,
वाडीवऱ्हे, नाशिक

## सकारात्मक दृष्टिकोन

जीवन म्हणजे वाहती नदी
वळणावळणांनी भरलेली
कधी आनंद, कधी दुःख
अनुभवांची शिदोरी देणारी

वादळ आले, अंधार दाटला
म्हणून सूर्य कधी हरवत नाही
धीर धरून पुढे चालणारा
यशापासून दूर राहत नाही

पडणे हा शेवट नसतो
उठणे हीच खरी जिद्द असते
प्रत्येक अपयशाच्या पाठीशी
यशाची नवी वाट असते

काट्यांमध्येही फुल उमलते
हेच निसर्ग शिकवून जातो
आशेचा दीप मनामध्ये
प्रत्येक संकटावर मात करतो

तक्रारींनी आयुष्य बदलत नाही
कृतीने नवे क्षितिज गाठता येते
सकारात्मक विचारांच्या बळावर
अशक्यही शक्य करता येते

(संकलीत)

**कावेरी जाधव,** इयत्ता १२ वी,
धनलक्ष्मी ज्युनियर कॉलेज,
पाथर्डी फाटा

## बालपण श्रीमंती

एक रुपयात होतो
आम्ही आमचे राजे
न कसले टेंशन
ना कसले ओझे

मातीत आम्ही रंगलो
न कसलं इन्फेक्शन
जगलोच आम्ही असे
सोडला नाही एक क्षण

कपडे फाटलेले
मस्तीने मळकटलेले
दिन रात्र असे
आम्हासाठी एकटवलेले

कळलेच नसे कधी भान
तहान भूक तर आम्ही
ठेवली होती गहान

कधी फुटली डोकी
तर कधी ढोपर ही फुटले
जगलोच असे की वेदनेचे
काहीच नाही वाटले

दुःखाला तर आम्ही
ओळखतच नव्हतो
उत्साहाने तेव्हा बेभान

(संकलीत)

**-ऋषीता जगताप**, इयत्ता ५वी,
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल,
पाथर्डी फाटा

## प्रकाशाची पूजा

प्रकाश प्रकाश
देशी सूर्यदेवा

प्रणाम आदिला
आमुचा हा घ्यावा

प्रकाश देऊनी
आरोग्य तू देशी

बुद्धीदाता तूची
चैतन्याची राशी

सहस्त्रकरांनी हेम उधळीत
येशी जाशी भास्करा सर्वां सुखवीत

श्रीमंताघरी देवा, जाशी तू रमत
गरीबाघरी तू  जाशी मुक्तहस्त

प्रकाशाची पूजा घ्यावी नारायणा
ज्ञान, बाल आम्ही शरण चरणा

(संकलीत)

**-ज्ञान्वी खैरनार**, इयत्ता १ली,क
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल,
पाथर्डी फाटा

## वेळ

वेळ कधीच थांबत नसते
ती अखंड पुढेच जात असते
तिच्या प्रत्येक क्षणामध्ये
यशाची बीजे दडलेले असते

काल गेला तो परत न येई
उद्याचा भरवसा कुणाला नसे
आजचा दिवस जपून जगला
जर जीवन आनंदाने फुले

आळसाला दूर सारून
कष्टांची वाट धरावी
लहानशा प्रयत्नांच्या थेबांनी
नदी भरावी यशाची

वेळ शिकवते हसणे-रडणे
अपयशातून पुन्हा उभे राहणे
संयम धैर्य चिकाटी घेऊन
स्वप्नांच्या दिशेने चालत राहणे

चला वेळेचे मोल जाणूया
प्रत्येक दिवस अर्थपूर्ण बनुया
चांगल्या विचारांनी चांगल्या कृतींनी
सुंदर भविष्य आपण घडूया

(संकलीत)

**-सोहम पाटील**, इयत्ता ७वी,
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल,
पाथर्डी फाटा

## माझा भारत महान

माझा भारत देश महान
साऱ्या जगात त्याचा मान
हिमालयाचा उंच मुकुट
सागर धुते त्याचे चरण.

हिरवीगार शेते डोलतात
नद्या गातात गोड गाणे
विविधतेत एकता नांदते
हेच भारताचे खरे लेणे

अनेक भाषा, अनेक धर्म
तरी मनाने सारे एक
प्रेम, शांती, बंधुभावाचा
भारत देतो सुंदर संदेश

तिरंगा आमचा अभिमान
उंच फडकतो नभामध्ये
केशरी, पांढरा, हिरवा रंग
भरतो उत्साह प्रत्येकामध्ये

शूर वीरांच्या बलिदानाने
मिळाले आम्हा स्वातंत्र्य महान
त्यांच्या त्यागाची आठवण ठेवून,
राखू भारताचा सन्मान.

(संकलीत)

**संस्कृती देसले**, इयत्ता १२ वी,
धनलक्ष्मी ज्युनियर कॉलेज,
पाथर्डी फाटा

## पाऊस

आभाळभरती काळे ढग,
वारा गातो गाणे
पहिला थेंब पडताच
माती सुगंधाने भरते
टपटप थेंब झेलत झाडे,
पाने धुऊन निघती

हिरवी शाल पांघरून धरती
नव्या रूपात सजती
झुळझुळ वाहती ओढे-नाले
नद्या गातात गाणी

डोंगर-दऱ्या हसत उमलती
भरते निसर्गराणी
इंद्रधनूचे सात रंग
आकाशी खुलती दारे
मोर पिसारा फुलवून नाचे
आनंद भरतो सारे

शेतकरी पाहे नभाकडे
डोळ्यांत आशा दाटे
पावसाच्या प्रत्येक सरीने
सोन्यासारखे पीक फुलते

(संकलीत)

**मयुरी गायकवाड**, इयत्ता १२ वी,
धनलक्ष्मी ज्युनियर कॉलेज,
पाथर्डी फाटा


## मानवधन संस्थेतच प्रवेश का घ्यावेत?

## 'यशाचे शिखर गाठण्यासाठी सज्ज व्हा !' सर्वांगीण विकासाची परिपूर्ण तयारी !!

- नाशिक जिल्ह्यातील ISO मानांकन प्राप्त पहिली संस्था
- सर्वांगीण विकासासाठी QBE पॅटर्न (Quality Base Education) राबवणारी एकमेव संस्था
- शिक्षणात सम्यक क्रांती कार्यातील योगदानाबद्दल घडवून आणल्याबद्दल 4 वर्ल्ड रेकॉर्ड प्राप्त करणारी पहिली संस्था
- प्रत्येकवर्षी १००% निकालाची परंपरा कायम राखणारी संस्था
- २५ हून अधिक ज्येष्ठ भारतीय शास्त्रज्ञ यांनी (डॉ. विजय भटकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. शंकरराव गोवारीकर इत्यादी) शाळेस भेट व शिक्षणातून देशाचा विकास या विषयावर सातत्याने मार्गदर्शन
- ५ कुलगुरूंची शाळेत भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष मार्गदर्शन
- अटल टिंकरिंग लॅबच्या माध्यमातून रोबोटिक वे ने ध्वजारोहण करणारी भारतातील पहिली संस्था
- 'छोटा पोलीस' उपक्रम सातत्याने राबवून ५०० हून अधिक लोकांचे प्रत्यक्ष प्राण वाचविणारी व वाहतूक सुरक्षा अभ्गीयान राबविणारी जिल्ह्यातील पहिली संस्था
- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेतून व मार्गदर्शनातून कोरोना काळाच्या अगोदर विद्यार्थी स्वतःचा हॅन्डवॉश स्वतः बनवून दररोज वापरणारी पहिली संस्था
- इयत्ता पहिली पासून कॉम्प्युटर असेंबल व डीअसेंबल तसेच २६ हून अधिक कोर्सेस द्वारे कौशल्य विकास कार्यक्रम राबविणारी पहिली संस्था
- उद्याची गरज ओळखून २०१३ पासून इयत्ता पहिली च्या वर्गापासून ऑनलाईन परीक्षा घेणारी महाराष्ट्रातील पहिली संस्था
- नर्सरी पासून संस्कृत विषयाचे शिक्षण देणारी पहिली संस्था
- सन २०१४ रोजी शालेय स्तरावर मानवधन विश्व् वाणी रेडिओ केंद्र सुरु करणारी भारतातील पहिली संस्था
- विज्ञान, अध्यात्म व कृषी पूरक अभ्यासाकरिता मानवधन विश्व ज्ञानपीठ वारकरी गुरुकुल तर्फे नेपाळ देशात विश्वशांती करीता आंतरराष्ट्रीय कीर्तन महोत्सव आयोजन करणारी पहिली संस्था
- संशोधन क्षेत्रात पेटंट मिळवणारी व बालवैज्ञानिक निर्माण करणारी पहिली संस्था
- एक कोटीहून अधिक रकमेची विक्रमी वीज बचत करणारी Energy Conservation Award मिळवणारी पहिली संस्था
- नाशिक जिल्ह्यात NCSC च्या अंतर्गत ३१ वर्षानंतर प्रथमच बाल विज्ञान परिषद भरून बालवैज्ञानिक घडवणारी पहिली संस्था
- बालविद्या साहित्य संगम द्वारे MPSC UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांच्या धरतीवर मी स्कॉलर परीक्षा घेणारी व केरळ पॅटर्न राबवणारी पहिली संस्था
- मानवधन डिजिटल स्कूल ॲप (MDS) द्वारे शैक्षणिक क्षेत्रात डिजिटल क्रांती घडविणारी पहिली संस्था
- नाशिक जिल्ह्यात प्रथमच ISSAR अंतर्गत शिक्षक व विद्यार्थ्यांना कृतियुक्त प्रशिक्षण देणारी पहिली संस्था
- नाशिक शहरात प्रथमच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वैज्ञानिक व्याख्यानमालेची सुरुवात करून बालवैज्ञानिक निर्माण करणारी पहिली संस्था
- मानवधन शालेय वृत्तपत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, पालकांना व्यक्त होण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणारी एकमेव, ज्ञानार्जन करणारी पहिली संस्था
- २०२० मध्ये NEP ने दर्शविलेले उपक्रम व शैक्षणिक धोरण २००५ पासून राबवून उपक्रमशील संस्था म्हणून नावाजलेली संस्था
- 'सुदृढ शरीर सशक्त भारत' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार तक्ता देणारी पाहिली संस्था
- लोकशाही बळकटीकरणासाठी इयत्ता पहिलीपासून लोकशाही शिक्षण' हा विषय कार्यक्षमपणे राबवणारी पहिली संस्था
- मूल्याधिष्ठित शिक्षणाची पायाभरणी करण्यासाठी व्हॅल्यू लॅब सुरु करणारी नाशिक शहरातील एकमेव संस्था
- विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन रुजवण्यासाठी इयत्ता पहिली पासून वैज्ञानिक प्रयोग राबविणारी पहिली संस्था
- सांस्कृतिक, अध्यात्मिक, वैचारिक, व्यक्तिविशेष, दिनविशेष, वैज्ञानिक यासोबतच शैक्षणिक वस्तुनिष्ठ माहिती देणारी 'मानवधन दिनदर्शिका' निर्माण करणारे एकमेव संस्था



आम्ही घडविणार....आदर्श माणूस ! आदर्श भारत !

**नर्सरी ते १२ वी**
मराठी, सेमी आणि इंग्लिश मिडीयम

**प्रवेश सुरु !**
**डोनेशन नाही**

धनलक्ष्मी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पाथर्डी फाटा, नाशिक
धनलक्ष्मी ज्युनिअर कॉलेज पाथर्डी फाटा, नाशिक
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडिअम स्कूल पाथर्डी फाटा, नाशिक
प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडिअम स्कूल जाधव संकुल, सातपुर, नाशिक
ब्राईट इंग्लिश मिडिअम स्कूल वाडीव-हे, ता. इगतपुरी, जि. नाशिक

## » बोधकथा !

### राजा जनक आणि ऋषि अष्टावक्र

राजा जनक राजा असूनही त्यांना राजवैभवात आसक्ती नव्हती. लोभ मोहापासून ते सदैव दूर राहात. विनम्रता त्यांच्या स्वभावात होती. त्यामुळे ते आपले दोष दूर करण्याचा प्रयत्न करत असत. आत्मशोध घेण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न सुरुच असे. एकदा ते नदीकाठावर एकांतात बसून 'सोऽहम' चा जप करत होते. मोठ्या आवाजात त्यांचा जप सुरु होता. तेवढ्यात तेथून अष्टावक्र ऋषि चालले होते. ते परमज्ञानी असल्याने त्यांना राजा जनकाचा जप ऐकून ते जागेवरच थांबले व एका हातात छडी घेऊन थोडे दूर अंतरावर उभे राहिले. मग मोठ्या आवाजात तेही बोलू लागले,''माझ्या हातात कमंडलू आहे आणि माझ्या हातात छडी आहे'' राजा जनकाच्या कानात ऋषींच्या बोलण्याचा आवाज गेला पण त्याने आपला जप सुरुच ठेवला. अष्टवक्रही ही गोष्ट जोरजोरात बोलत राहिले. शेवटी जनकाने जप थांबवून विचारले,''मुनिवर, हे तुम्ही मोठमोठ्याने काय सांगत आहात'' अष्टावक्र जनकाकडे पाहून हसले आणि म्हणाले,''माझ्या हातात पाण्याचा कमंडलू आहे, माझ्या हातात छडी आहे'' राजा जनक आश्चर्यात पडला व विचारू लागला,'' महाराज अहो हे तर मलाही दिसत आहे की तुमच्याजवळ छडी आणि कमंडलू आहे पण हे दिसत असतानासुद्धा तुम्ही मोठ्याने ओरडून का सांगत आहात.'' तेव्हा अष्टावक्रांनी जनक राजांना समजाविले,'' राजन, माझ्याजवळ असणारा कमंडलू आणि छडी दिसत असतानासुद्धा ओरडून सांगणे हे जसे मूर्खपणाचे आहे तसेच तुमचे सोऽहम उंच आवाजात म्हणणे आहे. मंत्राला घोकण्याने काहीच फळ मिळत नाही. मंत्र आत्मसात करणे किंवा त्याला आतल्या चेतनेशी जोडल्यावरच त्याचे फळ मिळते.''

**तात्पर्य : कोणतेही ज्ञान घोकंपट्टी करून मिळवण्यापेक्षा ते आत्मसात करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कोरडे पाठांतर काहीच कामाचे नसते.**

## » स्वागतार्ह

### शाळेत जाणाऱ्या लहान मुलांच्या पालकांची मानसिकता बदलणे : काळाची गरज

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात मुलांचे संगोपन आणि शिक्षण ही मोठी जबाबदारी बनली आहे. अनेक पालक आपल्या मुलांनी अभ्यासात नेहमी पहिला यावे, सर्वच क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करावी अशी अपेक्षा ठेवतात. परंतु प्रत्येक मूल वेगळे असते, त्यांची क्षमता, आवड आणि शिकण्याची पद्धतही वेगळी असते. त्यामुळे पालकांची मानसिकता बदलणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. पूर्वी शिक्षणाचा मुख्य उद्देश फक्त चांगले गुण मिळवणे हा मानला जात होता. आज मात्र शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तकापुरता मर्यादित राहिलेला नाही. मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, संवादकौशल्य, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीव विकसित होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे पालकांनी फक्त गुणांवर भर न देता मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यायला हवे. अनेक वेळा पालक आपल्या अपूर्ण स्वप्नांचा भार मुलांवर टाकतात. डॉक्टर, इंजिनियर किंवा अधिकारी बनण्याचा दबाव मुलांवर आणला जातो. यामुळे मुलांमध्ये ताण, भीती आणि आत्मविश्वास कमी होण्याची समस्या निर्माण होते. प्रत्येक मुलामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. काही मुलांना खेळ, कला, संगीत, विज्ञान किंवा इतर क्षेत्रांत अधिक आवड असू शकते. पालकांनी त्या गुणांना ओळखून प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच आजच्या डिजिटल युगात मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

## » देशाची ओळख

### मंगोलिया




मंगोलिया हा पूर्व आणि मध्य आशियातील एक देश असून, उत्तरेला रशिया आणि इतर तिन्ही बाजूंना चीनने वेढलेला आहे. उलानबातर ही राजधानी व सर्वात मोठे शहर आहे; हा जगातील सर्वात कमी लोकसंख्येची घनता असलेला स्वतंत्र देश आहे, जिथे निसर्गरम्य पर्वत, पठारे आणि अर्ध-वाळवंटी प्रदेश आढळतात. हा ऐतिहासिकदृष्ट्या चंगीझ खानच्या साम्राज्यासाठी प्रसिद्ध आहे आणि सध्या एक लोकशाही देश म्हणून ओळखला जातो, जिथे बौद्ध धर्म प्रमुख आहे. या देशाची राजधानी उलानबातर (Ulaanbaatar) रशियाच्या उत्तरेस आणि चीनच्या दक्षिणेस, आशिया खंडात स्थित आहे. जगातील सर्वात कमी लोकसंख्या घनता असलेला देश, जिथे बहुतेक लोक एकाच भागात केंद्रित आहेत. उंच पर्वत, पठारे आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेला देश, ज्याला 'निळ्या आकाशाची भूमी' म्हणतात. मंगोलिया देशाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे.

## » वलयांकित

### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे महाराष्ट्रातील एक अत्यंत पूजनीय संत होते. त्यांचा जन्म १९व्या शतकात झाला आणि त्यांनी भक्ती, नामस्मरण आणि साधेपणा यांचा संदेश समाजात पसरवला. राम नाम हेच जीवनाचे अंतिम सत्य आहे, हा त्यांचा मुख्य उपदेश होता. त्यांच्या विचारांमुळे महाराष्ट्रात अनेक भक्ती परंपरा अधिक दृढ झाल्या. गोंदवलेकर महाराजांचे जीवन अत्यंत साधे होते. त्यांनी बाह्य अवडंबर कर्मकांड किंवा दिखावा यापेक्षा अंतर्मनातील श्रद्धा आणि भक्ती याला अधिक महत्त्व दिले. त्यांच्या मते, देव शोधण्यासाठी बाहेर भटकण्याची गरज नाही; तो आपल्या मनातच आहे, फक्त मन शुद्ध ठेवणे आणि नामस्मरण करणे आवश्यक आहे. त्यांचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे नामस्मरण. सतत भगवंताचे नाव घेत राहणे हेच मनःशांतीचे आणि मोक्षाचे साधन आहे, असे ते सांगत. त्यांच्या मते, कोणत्याही परिस्थितीत-आनंदात किंवा दुःखात-राम नाम जपल्याने मन स्थिर राहते आणि जीवनात सकारात्मकता येते.

## » पर्यावरण जगत


### शहरातील कचऱ्यापासून खतनिर्मिती : काळाची गरज



आजच्या वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणामुळे शहरांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होत आहे. घरगुती ओला कचरा, भाजीपाला, फळांची साल, अन्नाचे उरलेले पदार्थ आणि बागेतील जैविक कचरा योग्य प्रकारे व्यवस्थापित न केल्यास पर्यावरणावर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे शहरातील कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्माण करणे ही केवळ गरज नसून पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी बनली आहे. ओल्या कचऱ्यापासून तयार होणारे सेंद्रिय खत हे जमिनीची सुपीकता वाढविणारे आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणारे प्रभावी साधन आहे. शहरातील मोठ्या प्रमाणातील जैविक कचरा जर खतनिर्मितीसाठी वापरला गेला, तर कचऱ्याचे ढीग कमी होतील, दुर्गंधी व प्रदूषणावर नियंत्रण मिळेल आणि शहर अधिक स्वच्छ व निरोगी बनेल. कचऱ्यापासून खत तयार करण्याची प्रक्रिया सोपी आणि उपयुक्त आहे. घरगुती ओला कचरा वेगळा गोळा करून कंपोस्ट खत तयार करता येते. हे खत बागकाम, शेती आणि वृक्षारोपणासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

## » ओळख जागतिक संघटनांची

### एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक




एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) ही आशियातील पायाभूत सुविधा विकासासाठी स्थापन करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आहे. या बँकेची स्थापना सन २०१६ मध्ये करण्यात आली. (AIIB) चे मुख्यालय चीनची राजधानी बीजिंग येथे आहे. आशियातील रस्ते, रेल्वे, वीज, पाणीपुरवठा, बंदरे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांना आर्थिक मदत देणे हा या बँकेचा मुख्य उद्देश आहे. (AIIB) ची स्थापना चीनच्या पुढाकारातून झाली. आशियातील विकसनशील देशांना आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन अनेक देशांनी एकत्र येऊन (AIIB) ची निर्मिती केली. आज या बँकेत भारतासह अनेक देश सदस्य आहेत. (AIIB) चे मुख्य कार्य म्हणजे विविध देशांतील विकास प्रकल्पांसाठी कर्ज आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे. ही बँक पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाला प्राधान्य देते. स्वच्छ ऊर्जा, हरित तंत्रज्ञान आणि टिकाऊ पायाभूत सुविधा यांना(AIIB) विशेष महत्त्व देते.

## » ओळख लेखकाची

### अरुण टिकेकर



अरुण टिकेकर हे मराठी साहित्य, पत्रकारिता आणि इतिहासलेखन क्षेत्रातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. ते एक कुशल पत्रकार, संपादक आणि लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या लेखनात समाज, संस्कृती, इतिहास आणि राजकारण यांचा सखोल अभ्यास दिसून येतो. मराठी बौद्धिक विश्वात त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. अरुण टिकेकर यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात दीर्घकाळ कार्य केले. त्यांनी विविध नामांकित वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमध्ये संपादकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या लेखनशैलीत स्पष्टता, विश्लेषणात्मक दृष्टिकोन आणि विचारांची खोली दिसते. ते केवळ बातम्या देणारे पत्रकार नव्हते, तर घटनांचे सखोल विश्लेषण करणारे विचारवंत होते. त्यांनी मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये लेखन केले. इतिहास, समाजशास्त्र आणि संस्कृती या विषयांवर त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण लेख आणि ग्रंथ लिहिले. त्यांच्या लेखनातून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक बदल यांचे सुंदर चित्रण दिसते. अरुण टिकेकर यांनी अनेक शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्येही योगदान दिले. ग्रंथालय चळवळ आणि संशोधन क्षेत्रातही त्यांचे महत्त्वाचे कार्य आहे. ज्ञानप्रसार आणि वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

## » शास्त्रज्ञ ओळख

### उमेश वाघमारे



उमेश वाघमारे हे भारतातील एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचे संशोधन मुख्यतः पदार्थ विज्ञान (Materials Science), सैद्धांतिक भौतिकशास्त्र आणि संगणकीय भौतिकशास्त्र या क्षेत्रांमध्ये आहे. विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता प्राप्त शास्त्रज्ञ मानले जातात. उमेश वाघमारे यांनी उच्च शिक्षण भौतिकशास्त्र क्षेत्रात घेतले असून त्यांनी संशोधन कार्यात विशेष प्रावीण्य मिळवले आहे. सध्या ते Jawaharlal Nehru Centre for -dvanced Scientific Research (JNC-SR) येथे कार्यरत आहेत, जी भारतातील एक अग्रगण्य संशोधन संस्था आहे. येथे ते प्राध्यापक आणि संशोधक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात तसेच विविध वैज्ञानिक प्रकल्पांवर काम करतात. त्यांचे संशोधन विशेषतः नॅनो मटेरियल्स, क्रिस्टल स्ट्रक्चर्स, फेज ट्रान्झिशन्स (phase transitions) आणि पदार्थांच्या अणुस्तरीय वर्तनावर केंद्रित आहे. संगणकीय पद्धतींचा वापर करून पदार्थांच्या गुणधर्मांचा अभ्यास करणे हे त्यांच्या संशोधनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. यामुळे नवीन पदार्थांची रचना समजून घेणे आणि तंत्रज्ञानात त्यांचा उपयोग करणे सोपे होते. उमेश वाघमारे यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध (research papers) प्रकाशित केले आहेत.

## गुरूजी डॉट कॉम

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो या लेखात प्रश्नपत्रिका कशी सोडवायची हे पाहुया. मित्रांनो आपला सगळा अभ्यास स्मरणशक्तीवर अवलंबून आहे. म्हणजे वाचलेले किती लक्षात राहते यावर अभ्यास किती झाला हे लक्षात येते. आपण काय आणि किती लिहिले यावरून आपल्याला किती गुण मिळतील हे ठरते. म्हणून जितके महत्वाचे अभ्यास करणे आहे तितकेच महत्त्व आपण परीक्षेत काय लिहिता यावर अवलंबुन असते. आपण लिहित असलेली उत्तरपत्रिका कशी लिहिली यावर अवलंबून आहे. म्हणूनच आपले भविष्य आपणच लिहिणार आहोत. तुमच्या समोर आलेली प्रश्नपत्रिका तुमच्या मित्रांची किंवा इतरांची प्रश्नपत्रिका एकच असते तरीही गुण भिन्न का? कारण त्याने जास्त अभ्यास केला, प्रश्नपत्रिका त्याने आत्मविश्वासाने व अचुक सोडवली. यश तुम्हालाही मिळेल त्यासाठी नियोजनाप्रमाणे दररोज ६ तास अभ्यासाचे पालन करा. अभ्यासाचे दैनंदिन वेळापत्रक तयार करा तसेच गणित विषयाचा सराव करा. पहाटेचा वेळ वाचनासाठी द्या. सुट्टीच्या दिवशी वेळेचे नियोजन करून प्रश्नपत्रिका सोडवा.

## मना मनातील सत्य

जेव्हा कधी आपण अंतर्मनाची कातडी उसवून आत डोकावून पाहतो तेव्हा त्यात अगदी स्पष्ट दिसू लागते हृदयापासून ते डोक्याच्या कवटीच्या आत असलेल्या मुठभर मेंदूपर्यंत जाणारी एक शीर. तिने आतपर्यंत अनेक भावना संवेदना वाहून नेल्या असतील. मेंदूतून हृदयात आणि हृदयातुन मेंदूपर्यंत ती एक होती. जाणीवांच्या वणव्यात सापडलेला मी एकटा. एकटा ही परिस्थिती निर्माण होते किंवा निर्माण केली जाते पण विविध परीस्थितिची परिणीती ही एकटा करून जाणारी असू शकते. पण एकाकीपणाची भावना ही खऱ्याखुऱ्या अंतर्मनाचा आवाज असते. एकटेपणा लादला जातो एकावर , पण एकाकीपण जाणवाव लागत एकट्याला.

मी माझा एक एकटा एकाकी
अडगळीच्या तळाशी
उजेडाला दिली समई
आटलेल्या अश्रूंच्या तुपाची

गरजेला माणूस आणि, माणसाची गरज वेळ निघून गेल्यानंतर समजून उपयोग नसतो म्हणूनच भूतकाळ जूना होतो आणि वर्तमान नवीन कारण नवीन वस्तू, नवीन प्रेम, नवीन माणूस जास्त काळ टिकतात. जूनं नेहेमी अडगळ होवून बसतं. आपण जूनं साठवतो म्हणून अडगळी निर्माण होतात आणि ह्या अडगळी मनाचा खूप मोठा कोपरा अडवून ठेवतात. तो कोपरा रिकामा केला तर त्रास अडगळीला जास्त होतो. अडगळ रिकामा करणारा, ती अडगळ स्वखुशीने खाली करतो ती कायमची, कदाचित रिकामेपणाचा त्या अडगळीचा जास्त त्रास होत असावा. पण अडगळ ती , तीला कधीच समजलं नाही तीचं स्थान किती अर्थशून्य आहे.रिकामं करूण देण्या सारखं विसरुन जाण्यासारखं ... कायमच !!

## दखल

### भारताच्या संरक्षण दलाचे आधुनिकीकरण



भारत हा जगातील एक महत्त्वाचा आणि शक्तिशाली देश मानला जातो. देशाच्या सुरक्षिततेसाठी सक्षम संरक्षण व्यवस्था अत्यावश्यक असते. बदलत्या तंत्रज्ञानामुळे आणि आधुनिक युद्धपद्धतीमुळे भारताने आपल्या संरक्षण दलाचे मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण केले आहे. भारतीय सेना, नौदल आणि वायुदल यांना आधुनिक शस्त्रे, तंत्रज्ञान आणि साधनसामग्रीने सुसज्ज करण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. भारतीय लष्करात आधुनिक रणगाडे, क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि अत्याधुनिक बंदुका समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अर्जुन रणगाडा आणि टी–९० भीष्म यांसारखे आधुनिक रणगाडे सैन्याची ताकद वाढवतात. सीमावर्ती भागांमध्ये देखरेख करण्यासाठी ड्रोन आणि उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतीय वायुदलालाही आधुनिक लढाऊ विमानांनी सुसज्ज करण्यात आले आहे. राफेल, सुखोई सु–३० एमकेआय आणि तेजस ही आधुनिक विमाने भारताच्या हवाई सुरक्षेला अधिक मजबूत बनवतात. तसेच हवाई हल्ल्यांपासून संरक्षणासाठी अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भारतीय नौदलातही मोठे बदल करण्यात आले आहेत. आयएनएस विक्रांत आणि आधुनिक पाणबुड्यांमुळे भारताची सागरी सुरक्षा अधिक मजबूत झाली आहे. हिंद महासागर क्षेत्रात भारताने आपली उपस्थिती अधिक प्रभावी केली आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारत या धोरणाला विशेष महत्त्व दिले जात आहे. भारतातच शस्त्रे, विमाने, क्षेपणास्त्रे आणि इतर संरक्षण उपकरणे तयार करण्यावर भर दिला जात आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) ने अनेक आधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहेत. अग्नी क्षेपणास्त्र आणि ब्रह्मोस ही त्याची महत्त्वाची उदाहरणे आहेत.

## वचनामृत

### मेधा पाटकर



मेधा पाटकर या भारतातील प्रसिद्ध समाजसेविका असून त्यांनी गरीब, आदिवासी आणि विस्थापित लोकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष केला आहे. त्यांचा जन्म १ डिसेंबर १९५४ रोजी मुंबई (महाराष्ट्र) येथे झाला. त्यांच्या कुटुंबातच समाजसेवेची परंपरा असल्यामुळे त्यांना लहानपणापासूनच सामाजिक कार्याची प्रेरणा मिळाली. मेधा पाटकर यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथून शिक्षण घेतले आणि समाजकार्याचा मार्ग स्वीकारला. त्यांनी विशेषतः मोठ्या धरणांमुळे विस्थापित होणाऱ्या लोकांसाठी आवाज उठवला. या लोकांना योग्य पुनर्वसन आणि हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक आंदोलन केले.त्या नर्मदा बचाव आंदोलन या चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी एक आहेत. या आंदोलनाद्वारे त्यांनी नर्मदा नदीवरील धरण प्रकल्पांमुळे प्रभावित झालेल्या हजारो कुटुंबांसाठी लढा दिला. त्यांनी अहिंसात्मक मार्गाने आंदोलन करून सरकारचे लक्ष या समस्येकडे वेधले. मेधा पाटकर यांनी महिलांचे हक्क, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक न्याय या विषयांवरही काम केले आहे. त्यांच्या संघर्षामुळे समाजात जागरूकता निर्माण झाली आणि अनेक गरीब लोकांना न्याय मिळाला. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांचे जीवन साधे असून त्या नेहमीच लोकांच्या हक्कांसाठी लढत असतात.

## शोध किल्ल्यांचा

### इरशाळगड



इरशाळगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील एक प्रसिद्ध आणि आकर्षक डोंगरी किल्ला आहे. हा किल्ला सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला असून ट्रेकिंग प्रेमींसाठी अत्यंत लोकप्रिय ठिकाण मानले जाते. मुंबई–पुणे मार्गाजवळ असल्यामुळे येथे अनेक पर्यटक आणि गिर्यारोहक भेट देतात. इरशाळगड हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ३७०० फूट उंचीवर आहे. किल्ल्याचा आकार आणि उंच सुळका दूरवरूनही सहज दिसून येतो. या सुळक्यामुळे इरशाळगडची ओळख अधिक वैशिष्ट्यपूर्ण बनते. किल्ल्यावर पोहोचण्यासाठी पायवाटेने चढाई करावी लागते. चढाई करताना हिरवेगार डोंगर, दऱ्या आणि निसर्गरम्य दृश्य अनुभवायला मिळतात.
इतिहासाच्या दृष्टीने इरशाळगड हा किल्ला टेहळणीसाठी वापरला जात असावा असे मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आसपासच्या भागावर लक्ष ठेवण्यासाठी या किल्ल्याचे महत्त्व होते. जरी हा किल्ला इतर मोठ्या किल्ल्यांइतका विकसित नसला तरी त्याचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. किल्ल्यावर पाण्याच्या टाक्या, काही भग्न अवशेष आणि गुहा पाहायला मिळतात. पावसाळ्यात येथे विशेष गर्दी असते.

## ओळख भारतीय सणांची

### दीप अमावस्या



संध्याकाळी देवासमोर दिवा लावून शुभं करोति कल्याणम् म्हणून घरातील वडीलधाऱ्यांना नमस्कार करणे हा संस्कार पिढ्यांपिढ्या चालत आला आहे. आता आधुनिक जगात विजेच्या दिव्यांचे हजारो प्रकार असतानाही आपण देवासमोर मात्र तेल किंवा तुपाचाच दिवा लावतो. कारण त्याचा सात्विक प्रकाश अंधार दूर करतो आणि नजरेलाही सुखद, पवित्र वाटतो. दिवा मांगल्याचे प्रतिक आहे. दीप अमावस्या म्हणजे आषाढ अमावस्या होय. या दिवसानंतर श्रावण महिन्याची सुरुवात होते. भरपूर पाऊस व अंधारून येणे हे तर श्रावणाचे वैशिष्ट्य आहे. घरातील इकडे तिकडे ठेवलेले,धुळीने माखलेले दिवे, समया, निरांजन, लामणदिवे या सर्वांना एकत्र करून, घासून पुसून लख्ख करून ठेवण्याचा हा दिवस असतो.या दिवशी सर्व दिवे चकचकीत करून पाटावर मांडून ठेवावेत. पाटाभोवती सुरेख रांगोळी रेखाटावी, फुलांची आरास करावी.

## रोजगाराच्या वाटा

### सौर ऊर्जा



सौर ऊर्जा तंत्रज्ञ या क्षेत्रातील रोजगाराच्या संधी आजच्या काळात ऊर्जा गरजांमध्ये सातत्याने वाढ होत असून पारंपरिक ऊर्जास्रोतांवरचा ताण कमी करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भारत सरकार तसेच विविध राज्य सरकारे सौर ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देत असल्यामुळे सौर ऊर्जा तंत्रज्ञ (Solar Energy Technician) या क्षेत्रात रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध झाल्या आहेत. सौर ऊर्जा तंत्रज्ञाचे मुख्य काम सौर पॅनेल, इन्व्हर्टर, बॅटरी आणि इतर उपकरणांची स्थापना, देखभाल व दुरुस्ती करणे हे असते. घरगुती, व्यावसायिक तसेच औद्योगिक इमारतींवर सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी प्रशिक्षित तंत्रज्ञांची आवश्यकता असते. सौर ऊर्जा प्रकल्पांचे नियोजन, विद्युत जोडणी, प्रणालीची चाचणी आणि कार्यक्षमतेची तपासणी यांसारखी कामेही तंत्रज्ञ करतात. या क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध आहेत. सौर ऊर्जा उत्पादन करणाऱ्या कंपन्या, ऊर्जा सेवा पुरविणाऱ्या संस्था, विद्युत अभियांत्रिकी कंपन्या तसेच सरकारी आणि खासगी सौर प्रकल्पांमध्ये तंत्रज्ञांची मागणी वाढत आहे. याशिवाय अनुभव मिळाल्यानंतर स्वतः चा सौर ऊर्जा व्यवसाय सुरू करण्याची संधी देखील उपलब्ध आहे.

या शालेय वृत्तपत्रा संदर्भातील अधिक माहिती व प्रतीक्रियांसाठी संपर्क, संपादक, मानवधन शालेय वृत्तपत्र, कार्यालय धनलक्ष्मी बालविद्या मंदिर व प्राथमिक शाळा, पाथर्डी फाटा, नाशिक. मो.९५५२५४२३८१ E-mail id: mr. pskolhe@ rediffmail.com

## शैक्षणिक उपक्रम



### ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये हरिनामाचा गजर

**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल येथे आषाढी एकादशी सण उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानरत्न डॉ. प्रकाश दादा कोल्हे, संस्था सचिव ज्योती कोल्हे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा आवारे आदी मान्यवर उपस्थित होते. सरस्वती पूजन तसेच विठ्ठल रखुमाई यांच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे ज्येष्ठ सनदी अधिकारी श्री. तुकाराम मुंढे यांची भूमिका वठवणाऱ्या विद्यार्थ्यास पूजनाचा मान देण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाईच्या वेशभूषेत पांडुरंगाचे प्रति रूप सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बाल वारकऱ्यांनी दिंडी काढून व रिंगण बनवून वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवून दिले. वारकरी संप्रदायाचे प्रतीक असलेल्या दिंडी तसेच टाळ, मृदुंग यांच्या गजरात वारकरी परंपरेचा वारसा दाखविणाऱ्या दिंडीचे दर्शन घडविण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानरत्न डॉ.प्रकाश दादा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच अध्यात्माची ओळख देखील आपल्या जीवनात ठेवावी असे मत व्यक्त केले.

### प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी

**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, जाधव संकुल, नाशिक येथे गुरु पौर्णिमा हा सण कृतज्ञता, आदर आणि सांस्कृतिक उत्साहाने अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे (दादा), संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे, शाळेच्या समन्वयिका सुरेखा आवारे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती प्रधान यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञान आणि विद्वत्तेचे प्रतीक असलेल्या देवी सरस्वती आणि महर्षी व्यास यांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत फुलांचे गुच्छ अर्पण केले. विद्यार्थ्यांनी गुरु पौर्णिमेचे महत्त्व आणि शिक्षकांचे जीवन घडविण्यातील अमूल्य योगदान यावर भाषणे सादर केली. भक्तिगीते, नाटिका आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रम अधिक रंगतदार केला. या शुभ प्रसंगी डॉ. प्रकाश कोल्हे (दादा) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षकांचा आदर करण्याचे आणि त्यांनी दिलेले ज्ञान व मूल्ये जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच निसर्ग हा आपला सर्वात मोठा गुरु असून तो जीवनातील अनेक शिकवणी सतत देत असतो, असे प्रेरणादायी विचार त्यांनी मांडले. सचिव ज्योती कोल्हे यांनी सांगितले की गुरु हा खऱ्या अर्थाने ज्ञानाचा स्रोत असून तो विद्यार्थ्यांच्या चारित्र्य व भविष्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षकांचे मार्गदर्शन हे प्रत्येक व्यक्तीसाठी आयुष्यभराचे अमूल्य धन असते, असेही त्यांनी नमूद केले.

# प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये ‘राष्ट्रीय डॉक्टर्स डे’ उत्साहात साजरा



**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचालित, प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये ’राष्ट्रीय डॉक्टर्स डे’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समाजात डॉक्टरांचे असलेले योगदान आणि त्यांचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संस्थापक प्रकाश कोल्हे , संस्था सचिव ज्योती कोल्हे व शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थापक प्रकाश कोल्हे यांनी, डॉक्टर हे समाजाचे रक्षक आहेत. त्यांचे कार्य निस्वार्थी आणि वंदनीय आहे असे प्रतिपादन केले. संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले व डॉक्टरांच्या सेवेचा आदर करण्याचे संस्कार बालवयातच रुजणे गरजेचे असल्याचे सांगितले. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार यांनी डॉक्टरांच्या कार्याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली.विद्यार्थ्यांनी या दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवले. डॉक्टरांच्या जीवनावर आधारित सुंदर चित्रे आणि पोस्टर तयार केले. कोरोना काळ आणि आपत्कालीन स्थितीत डॉक्टर कशाप्रकारे देवदूतासारखे धावून येतात, याचे जिवंत दृश्य विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे सादर केले.

## ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये डॉ. नारळीकर जयंती साजरी

**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था, नाशिक संचलित ब्राईट इंग्लिश मिडीयम स्कूल, वाडीवऱ्हे येथे जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ, विज्ञानप्रसारक आणि पद्मविभूषण डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. नारळीकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, मनोगते तसेच विज्ञानविषयक विचार सादर केले. शिक्षकांनी डॉ. नारळीकर यांनी भारतीय खगोलशास्त्र, विज्ञान संशोधन आणि विज्ञानप्रसार क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांच्या जिज्ञासू वृत्ती, संशोधनाची आवड आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असे आवाहन करण्यात आले. डॉ. नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी झाला होता आणि ते आयुका संस्थेचे संस्थापक संचालक होते.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे, संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. संस्थेच्या समन्वयिका सुरेखा आवारे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचारसरणी जोपासण्याचे महत्त्व पटवून दिले. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## कारगिल विजय दिनानिमित्त शूर वीर जवानांना भावपूर्ण अभिवादन

**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्थेच्या प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, जाधव संकुल, नाशिक येथे कारगिल विजय दिन देशभक्ती, अभिमान आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक मा. ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे (दादा), संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे मॅडम, शाळेच्या समन्वयक मा. सुरेखा आवारे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मा. ज्योती प्रधान यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर वीर जवानांना पुष्पांजली अर्पण करून कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भारतीय सशस्त्र दलाच्या शौर्यगाथा, पराक्रम, समर्पण आणि बलिदान यांविषयी प्रेरणादायी भाषणे सादर केली. अनेक विद्यार्थी भारतीय सैनिकांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते.

शैक्षणिक वृत्तपत्र
# मानवधन

पान ८

जुलै २०२६

## शैक्षणिक उपक्रम

### प्रोग्रेसिव्हच्या विद्यार्थ्यांनी गिरवले स्वराज्याचे धडे

**नाशिक** : प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल पाथर्डी फाटा येथे बाळ गंगाधर टिळक अर्थात लोकमान्य यांना विनम्र अभिवादन करीत जयंती साजरी झाली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे दादा, संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन करून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक बाबींची माहिती देण्यात आली. या राष्ट्रभक्ताची देशभक्ती, देशावरील निस्सिम आणि निस्वार्थी प्रेम, आणि आदर व्यक्त करीत त्यांच्यासारखे असंख्य गुण विद्यार्थ्यांनी अंगीकृत करावे असा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांसारखी वेशभूषा परिधान केली होती.

# ‘विठू नामाचा गजर’ करीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## ग्रंथदिंडी पूजनाने प्रारंभ; अभंग, गवळणी आणि विठ्ठलनामाने परिसर भक्तिमय



**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित धनलक्ष्मी बालविद्यामंदिर येथे आषाढी एकादशी निमित्त पारंपरिक आषाढी दिंडी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाली. ‘विठू नामाचा गजर’ करीत विद्यार्थ्यांनी विठ्ठलभक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविला

या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे (दादा) व संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करून झाली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, संत परंपरेतील संस्कार, पर्यावरण संरक्षणाची गरज आणि सामाजिक जबाबदारी यांविषयी मार्गदर्शन केले. या दिंडीत मानवधन विश्वज्ञानपीठ गुरुकुल तसेच धनलक्ष्मी बालविद्यामंदिर येथील बालवारकऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ–मृदंगाच्या ठेक्यावर संतांचे अभंग, गवळणी आणि ‘विठू नामाचा गजर’ करत विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसर भक्तिमय केला. पर्यावरण जनजागृती करणारे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन, स्वच्छता आणि निसर्गरक्षणाचा संदेश दिला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचा खरा अर्थ समजून घेत भक्ती, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम अनुभवला. विठुरायाच्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या बालगोपालांनी खऱ्या अर्थाने विठ्ठलभक्तीचा आनंद लुटत उपस्थितांची मने जिंकली.



# प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय कृषी दिन उत्साहात साजरा

**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आवड निर्माण व्हावी आणि शेतकऱ्यांचे महत्त्व कळावे, या उद्देशाने शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी संस्थेचे संस्थापक प्रकाश कोल्हे, संस्था सचिव ज्योती कोल्हे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. कृषीदिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांनी शेतीची अवजारे, पिके आणि धान्याची सुंदर प्रदर्शनी भरवली होती. काही विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांचा पेहराव करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच मातीशी आणि शेतीशी जोडले जाणे गरजेचे आहे असे मनोगत व्यक्त केले. संस्था सचिव ज्योती कोल्हे यांनी आधुनिक शेतीची गरज आणि पर्यावरण पूरक जीवनशैलीवर भर दिला. तसेच, मुख्याध्यापिका वैशाली पवार यांनी विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांमधील सहभागाचे कौतुक करून सर्वांचे आभार मानले.या प्रसंगी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नाशिक जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत धनलक्ष्मी शाळेच्या मुलींचा संघ उपविजेता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**नाशिक** : मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था संचलित धनलक्ष्मी बालविद्यामंदिर प्राथमिक शाळा, पाथर्डी फाटा येथील १७ वर्षाखालील मुलींच्या टेनिस क्रिकेट संघाने दिंडोरी येथे आयोजित नाशिक जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत जिल्हाभरातील २५८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. धनलक्ष्मी शाळेच्या मुलींनी सांघिक खेळ, जिद्द आणि उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा परंपरेत आणखी एका यशाची भर घातली.

या उल्लेखनीय यशामुळे धनलक्ष्मी बालविद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या मुलींच्या संघाची कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही शाळेसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

या यशामागे क्रीडा शिक्षक श्री. अनिकेत भवर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रभावी प्रशिक्षणामुळे आणि मुलींच्या अथक मेहनतीमुळे संघाने हे यश संपादन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे तसेच संस्था सचिव व मुख्याध्यापिका ज्योती कोल्हे यांनी सर्व खेळाडू मुली व क्रीडा शिक्षक श्री. अनिकेत भवर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धे साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.